International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# पुणे महानगर परिवहन महामंडळाचे उत्पन्न – खर्चाचा आर्थिक अभ्यास : (२०२० - २०२५)

**बाळासाहेब विठ्ठल कांगणे[1], प्रा.डॉ.आदिनाथ मोरे[2]**

*[1]संशोधन विदयार्थी, संगमनेर नगरपालिका, दा.ज.मालपाणी, वाणिज्य आणि ब.ना.सारडा, विज्ञान महाविदयालय (स्वायत), ता. संगमनेर, जि.अहमदनगर*

*[2]प्राचार्य कला, वाणिज्य व विज्ञान, महाविदयालय,लासलगाव,नाशिक*

*Corresponding Author –* **बाळासाहेब विठ्ठल कांगणे**

**DOI - 10.5281/zenodo.20485777**

**सारांश:**

*आजच्या आधुनिक युगात मोठ्या प्रमाणात वाहतुक व्यवसायाचा विकास झालेला आहे. वाहतुक व्यवसायात अनेक संस्था राज्य सरकार व केंद्र सरकार कार्यरत आहेत. प्रत्येक ठिकाणी मालवाहतुक, प्रवासी वाहतुक व इतर वाहतुक यांची व्याप्ती मोठ्या प्रमाणात वाढली आहे.*

*त्यामुळे पुणे शहर हे वेगाने वाढणारे एक शहर असून हया शहरांची लोकसंख्या जवळजवळ एक कोटी जवळ आहे. मोठया प्रमाणात असणारे उदयोग धंदे, शिक्षण व्यवस्था, रोजगार, विविध स्वरुपांच्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्या यामुळे मोठ्या प्रमाणात वेगाने विकास होत आहे. त्यामुळे दिवसेंदिवस भरमसाठ वेगाने पुणे शहरांची वाढ व विकास होत आहे.*
*त्यामुळे पुणे शहरातील अंतर्गत प्रवासी वाहतुक करणारी संस्था पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (PMPML) हि महत्वाची संस्था मानली जाते. परंतु पुणे महानगर परिवहन महामंडळ हे उत्पन्न व खर्चाच्या तुलनेने व आर्थिक क्षमतेने कमकुवत बनले आहे. त्यामुळे हि संस्था दिसून राहावी यासाठी त्यात सुधारणा होणे गरजेचे आहे. त्यामुळे अंतर्गत वाहतुक व्यवस्थेला मोठया प्रमाणात चालना मिळणार आहे.*

*त्यामुळे आजच्या संशोधन लेखातुन पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड (PMPML) यांच्या व्यवस्थेवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.*

---

**प्रास्ताविक:**

कोणत्याही देशाचा विकास हा तेथिल पायाभूत सुविधांवर अवलंबुन असतो. या पायाभुत सुविधांमध्ये वाहतुक या घटकास अनन्य साधारण महत्व आहे. वाहतुक व दळणवळण सर्वच देशांसाठी महत्वाचे असतात. वाहतुकीमुळे दळणवळण हे अधिक जलद गतीने होत असते. भारत हा एक खंडप्राय देश आहे. भारताचे एकुण क्षेत्रफळ ३२,८७,२६३ चौ.की. नी. आहे. आहे. भारताची लोकसंख्या सध्या १४९ कोटीपेक्षा जास्त आहे. कोणत्याही देशात प्रवासी वाहतुक आणि नाल वाहतुकीच्या सोयी असणे हे प्रगत देशाचे लक्षण मानले जाते. भारतात रस्ते वाहतुकीचे जाळे ६६.७९ लाख कि.मी. अंतराचे आहे. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग ९.४६.१४५ कि.मी. राज्य महामार्ग १.७८,५५३ कि.मी. आणि इतर रस्ते ६३.४५.४०३ कि.मी. लांबीचे आहे. देशभरात सार्वजनिक व खाजगी वाहनांद्वारे वाहतुक केली जाते. महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक वाहतुकीस सुरवात १९३२ मध्ये झाली. १९४७ साली भारतातील ब्रिटिश राजवट संपुष्टात आली. त्यानंतर स्वतंत्र

भारताच्या मुंबई प्रांतात १९४८ मध्ये बॉम्बे स्टेट रोड ट्रांसपोर्ट कॉर्पोरेशची (बी.एस. आर.टी.सी.) स्थापना झाली. १ जुन १९४८ रोजी पुणे ते अहमदनगर मार्गावर पहिली एस.टी. बस धावली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मीती झाली. त्यांनंतर महाराष्ट्रातील सार्वजनिक वाहतुकीसाठी बी.एस.आर.टी.सी. चे विलीनिकरण होऊन नवीन सार्वजनिक वाहतुकीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाने कारभार सुरू केला. या महामंडळा अंतर्गत राज्यांतर्गत व राज्याबाहेर वाहतुक केली जाते. परंतु शहरी भागात देखिल लोकांना मोठ्य प्रमाणावर वाहतुक सुविधांची आवश्यकता होती. त्यासाठी अशा मोठ्य शहरांमध्ये देखिल सार्वजनिक वाहतुक सुरू करण्यात आली. यातील पुणे शहराचा विचार करता शहरामध्ये अनेक प्रकारची प्रवासी वाहतुक होत असली तरी सर्वात जास्त प्रवासी वाहतुक ही पुणे परिवहन महामंडळाद्वारेच होताना दिसुन येते. पुणे परिवहन महामंडळाचे पुणे शहरातील प्रवासी वाहतुकीसाठी भरीव असे योगदान आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या आर्थिक उत्पन्नाचा आढावा घेणे.
२) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे उत्पन्न स्त्रोत अभ्यासणे.
३) पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. यांचे खर्चाचे स्त्रोत अभ्यासणे.
४) पुणे शहरातील वाहतूक व्यवस्थेचा आढावा घेणे.

**परिवहनाचा अर्थ:**

प्रत्येक राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेत परिवहन साधनांना अनन्य साधारण महत्व असते. भारतातील कृषी, उदयोग, व्यापार इत्यादी क्षेत्रांचा विकास आणि राष्ट्रीय उत्पन्नात वाढ घडवुन आणण्यासाठी परिवहन नदत करीत असते. म्हणुनच परिवहन अर्थातच वाहतुक हे अर्थव्यवस्थेचे प्रमुख अंग बनले आहे. रस्ते वाहतुक, हवाई वाहतुक आणि जल वाहतुक ही वाहतुकीची प्रमुख साधने आहे.

परिवहन शब्दाला हिंदीमध्ये 'यातायात' तर इंग्रजीमध्ये Transport आणि मराठीमध्ये वाहतूक असे म्हणतात. या परिवहनाचे मानव संसाधन प्रक्रियेत खुप महत्वाचे स्थान आहे. मानवाच्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय जीवनात अत्यंत सहत्वाचे स्थान आहे. परिवहन हा शब्द दोन शब्दांचा योग आहे.

'परि + वहन' = परिवहन

'परि' म्हणजे चांगल्या प्रकारे आणि 'बहन' म्हणजे घेऊन जाणे. आशा प्रकारे परिवहन या शब्दाचा अर्थ चांगल्या प्रकारे घेऊन जाणे असा होतो.

**पुणे शहरातील वाहतुक:**

पुणे शहर हे भारताच्या दख्खन पठारावरील महाराष्ट्र राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचे शहर आहे. २०११ च्या जनगणनेनुसार पुणे शहराची लोकसंख्या ३.१ दशलक्ष होती. पुणे हे जगातील नवव्या क्रमांकाचे सर्वात जास्त लोकसंख्या असलेले शहर आहे. पुणे शहरास सायकल शहर म्हणूनही ओळखले जाते. २०२० मध्ये पुणे शहरास शाश्वत वाहतुक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आशा शैक्षणिक व सांस्कृतिक वारसा असलेल्या पुणे शहराची वाहतुक पुढील मार्गानी केली जाते.

**परिवहन सेवेसाठी कौटिल्य यांचे आर्थिक विचार:**

व्यापार आणि वाणिज्य कौटिल्य यांनी व्यापार आणि वाणिज्याला प्रोत्साहन देण्यासाठी जल आणि स्थल मार्गाचा विकास करण्याचा सल्ला दिला आहे. त्यांनी

व्यापरिक मार्गावर सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यावर जोर दिला आहे.

- **कर प्रणाली:** कौटिल्याने कर प्रणालीमध्ये विविधता समानता आणि न्यायशिलता यावर जोर दिला आहे. त्यांनी भूमीकर मकानकर, आयात निर्यात कर, विक्रीकर इत्यादी करांचा उल्लेख केला आहे.
- **वस्तुंचे मुल्य निर्धारण:** कौटिल्याने वस्तुंचे मुल्य निर्धारण करण्यासाठी पण्याअध्यक्ष व संस्था अध्यक्ष यांची नियुक्ती करण्याचा सल्ला दिला आहे. त्यांनी वस्तुंच्या तुल्यामध्ये लागत, परिवहन व्यय, भाडे, इत्यादी घटकांचा समावेश करण्यावर जोर दिला आहे.
- **श्रमिकांचे कल्याण:** कौटिल्याने श्रमिकांच्या कल्याणासाठी अनेक प्रवाधान केले आहेत. त्यांनी श्रमिकांना उचित मजुरी देण्यावर भर दिला आहे.

**वाहतूक व्यवस्था:**

कौटिल्याने रस्ते वाहतूक जलवाहतूक यांचा विचार मांडला आहे. तसेच मालवाहतूक व प्रवासी वाहतूक यांच्याबद्दल आपले आर्थिक विचार मांडले आहे.

पुणे महानगर परिवहन महामंडळाचे उत्पन्नाचे स्त्रोत / बाजू -

१) दैनंदिन तिकीट विक्री

२) प्रवासी दैनिक पास योजना

३) प्रवासी मासिक पास योजना

४) ज्येष्ठ दैनिक नागरिक पास योजना

५) ज्येष्ठ नागरिक मासिक पास योजना

६) विदयार्थी मासिक पास योजना

७) विदयार्थी सहामाही पास योजना

८) पुणे व पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी पास योजना

९) विदयार्थी वार्षिक पास योजना

१०) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या प्रवासी ॲप (Apli PMPML) या अंतर्गत होणारी तिकीट विक्री.

११) पुणे शहरातील पर्यटन व्यवस्थेतुन निर्माण झालेले 'पुणे दर्शन' या योजनेतुन मिळणारे उत्पन्न.

१२) पुणे महानगर परिवहन महामंडळाने आपल्या स्वतःच्या ताब्यातील जागेवर करार पध्दतीने भाडेपट्टयावर निर्माण केलेले दुकाने, ऑफिसेस दैनंदिन स्वरुपाचे छोटे मोठे व्यवसाय इ.

१३) छोटया व सोठ्या स्वरुपाच्या विविध कंपन्याच्या जाहिराती तसेच होर्डींग यांच्यातुन मिळणारे उत्पन्न-

**पुणे महानगर परिवहन महामंडळाचे खर्चाचे स्त्रोत / बाजू:**

1) पुणे महानगर परिवहन महामंडळामध्ये कार्यरत असणान्या कर्मचारी वर्गाचे वेतन व भत्ते आणि सोईसुविधा.
2) पुणे महानगर परिवहन महामंडळामध्ये कार्यरत असणाऱ्या विविध स्वरुपांच्या बस व वाहने यांच्या दुरुस्तीसाठी व इतरांसाठी होणारा खर्च.
3) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या हद्दीत उभारण्यात आलेले छोटे- मोठे प्रवासी बसस्टॉप यावरील खर्च.
4) पुणे महानगर परिवहन महामंडळामध्ये कार्यरत कर्मचान्यांच्या सोई सुविधा करता उभारण्यात आलेले विविध इमारती व इतर घटकांवरील खर्च.
5) कर्मचारी व अधिकारी यांच्या पोषाखावरील खर्च.
6) कर्मकाऱ्यांच्या वैदयकीय सोई - सुविधेवरील खर्च.
7) कर्मचारी यांचे पाल्य शिक्षण घेत असतात त्यावर होणारा खर्च.
8) दैनंदिन, स्टेशनरी व इतर खर्च.

9) भाडेतत्वावर घेतलेल्या जागांवर दयावे लागणारे भाडे इ.

10) रस्ते व इतर प्रशासकीय कामकाजाकरता होणारा अंतर्गत व बर्हिगत खर्च व इतर स्वरुपाचे किरकोळ खर्च.

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड आर्थिक उत्पन्न - खर्चाचा साधारण अभ्यास / विश्लेषण:**

**(उत्पन्न - खर्च कोटीमध्ये)**

| Year | Total Income Crore ₹ | Total Expenses Crore ₹ | Operation Loss Crore | Operation Benefit ₹ |
|---|---|---|---|---|
| 2020-2021 | ₹ 164.61 | - | - | - |
| 2021-2022 | ₹ 291.17 | ₹ 1,010 | ₹ 718.97 | - |
| 2022-2023 | ₹ 510.00 | ₹ 1,162 | ₹ 726.78 | - |
| 2023-2024 | ₹ 611.65 | ₹ 1,348 | ₹ 734.00 | - |
| 2024-2025 | ₹ 660-700 | ₹ 1,420 | ₹ 7,6687 | - |

Annual Financial Performance (five year - 2020 to 2025)

**पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड चे उत्पन्न: खर्च विश्लेषण चिकित्सा:**

पुणे महागनर परिवहन महामंडळ लिमिटेड ही संस्था पुणे शहरासाठी अत्यंत व्यापक स्वरुपाची आहे. पुणे शहरात रस्ते वाहतुकीचा विकास जरी झालेला असला तरी त्या प्रमाणात अनेक अडचणी व समस्या मोठया प्रमाणात भेडसावत आहेत.

त्यामुळे शहरांच्या अंतर्गत प्रवासी वाहतुकी करता मोठया प्रमाणात पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड प्रयत्न करत असते. वरील उत्पन्न व खर्चाचे विश्लेषण पाहिले असता PMPML ही संस्था ही दिवसेंदिवस आर्थिक अडचणीत सापडली आहे. त्यामुळे पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड यांना नवीन व्यूहरचना करण्याची आवश्यकता आहे.

**शिफारशी:**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड हे पुणे शहरांसाठी अंतर्गत दळण वळण करणारी प्रवासी वाहतूक करणारी व्यवस्था आहे. सदर संस्थेच्या मागील पाच वार्षिक वर्षाचा उत्पन्न व खर्चाचा आढावा घेतला असता पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अर्थात (PMPML) ही संस्था आर्थिक संकटात सापडली आहे.

ही संस्था पुणे शहरांच्या विकासात टिकवून ठेवावी. यासाठी इतर अनेक संस्था सातत्याने प्रयत्न करत असतात. त्यात राज्य सरकारे, पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगर पालिका विशेष स्वरुपाचे आर्थिक अनुदान देत असतात. त्यामुळे पुढील वाटचालीत ही संस्था टिकवुन ठेवण्यासाठी विशेष स्वरुपाच्या शिफारशी करण्यात सदर संशोधन लेखातुन करण्यात येत आहे.

1) प्रवासी वाहतुक वेळापत्रकाचे योग्य नियोजन.

2) इंधनावरील विविध स्वरुपाची व पर्यायाची निवड करण्यात यावी.
3) गर्दीच्या ठिकाणी विशेष गाडयांचे नियोजन ठेवावे / करावे.
4) उच्चशिक्षित अधिकारी व कर्मचारी यांची निवड करण्यात यावी.
5) स्वमालकीच्या जागेवर उत्पन्न देणारे इतर व्यवसाय व उदयोग यांना संधी दयावी. योग्य प्रकारे जाहिरात अधिकारी व कर्मचाऱ्यांची निवड / नेमणूक करावी.
6) पुणे शहराला ऐतिहासिक वारसा उपलब्ध असल्याने पर्यटन व्यवसायाला चालना मिळेल या हेतुने नियोजन करावे.
7) पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेड अंतर्गत होणारा अनावश्यक खर्च टाळण्यासाठी आधुनिक स्वरुपाचे उच्च तंत्रज्ञान वापरावे.
8) तिकीट विक्रीसाठी मोठया प्रमाणांवर कागदांची छपाई करावी लागते. त्यामुळे मोठया प्रमाणात ई तिकीट व्यवस्था व प्रणाली निर्माण करावी.
9) अंतर्गत होणारा कागदपत्र व इतर स्टेशनरी खर्च व खर्चाला पर्याय म्हणुन डिजीटल व्यवस्था निर्माण करावी.
10) पारंपारिक वाहतूक व्यवस्थेऐवजी आधुनिक वाहतुक पध्दतीचा स्वीकार करावा.

**निष्कर्ष:**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि. ही पुणे शहराची अत्याधुनिक वाहतूक व्यवस्था आहे. पुणे शहराबरोबरच आजूबाजूच्या जिल्ह्यांमधील बहुसंख्य कामगार वर्ग पुण्यात स्थायिक झालेला आहे.

त्यांच्या वाहतूक व दळणवळणाच्या सोयीसाठी ही संस्था आर्थिक महत्त्वाचे कार्य करते. त्यामुळे ही संस्था टिकवून ठेवण्यासाठी सरकारला काही शिफारशी सादर करण्यात येत आहेत.

**संदर्भ:**

1. कंगले र.प. (१९८२), कौटिल्य अर्थशास्त्र.
2. Chandola S.P. (2015 ) A Textbook of Transportion
3. Sonar P.G. (2023) Advanced Transportation Engineering
4. www.puneparivahan.com
5. https://pmpml.org
6. जाधव तुकाराम (२०११), महाराष्ट्र वार्षिक युनिक ॲकेडमी, पुणे
7. सरकार आर.के. (२०१५), भारत मे ग्रामिण सडक परिवहन परिदृष्य